

# जिग्नेश शाहांचे मार्केट साम्राज्य उद्ध्वस्त करणाऱ्या राजकीय षडयंत्राची गाथा मराठीत

**मुंबई :** अत्यंत कमी वयात केवळ आपल्या बौद्धिक कौशल्याने देश-विदेशात वैश्विक दर्जाची उत्कृष्ट मार्केट्स निर्माण करून भारताला जगाच्या नकाशावर मानाचे स्थान प्राप्त करून देणाऱ्या नव उद्योजक ज़िग्नेश शाहांच्या विजयरथाला कुटिल राजकीय कारस्थान व हीन दर्जाच्या षडयंत्राने कसे उद्ध्वस्त करण्यात आले, याची पुराव्यासहित तपशीलवार गाथाच वरिष्ठ पत्रकार शांतनू गुहा रे यांनी आपल्या 'द टार्गेट' या पुस्तकात मांडली आहे. आता हे पुस्तक मराठी भाषेत अनुवादित करण्यात आले आहे.

नॅशनल स्पॉट एक्सचेंज लि. (एनएसईएल)मध्ये पेमेंट डिफॉल्ट घडवून जिग्नेश शाहांचे साम्राज्य उद्ध्वस्त करणाऱ्या षडयंत्राचा गौप्यस्फोट करणाऱ्या 'द टार्गेट' या पुस्तकाची मराठीत आवृत्ती प्रकाशित करण्यात आली. बाजारातील मक्तेदारी मोडित काढत विकासासहितच लाखो रोजगार निर्माण करणाऱ्या नव उद्यमशीलता व तंत्रज्ञानीय संशोधनात ज्यांनी खरेतर हातभार लावला पाहिजे, त्यांनीच या उद्यमशीलतेचा कसा गळा घोटला, हे सगळे गुहांनी पुराव्यासहितच मांडले आहे. असे करताना त्यांनी एनएसईएल पेमेंट डिफॉल्ट कोणी, का व कसे घडवून आणले व त्याचे कारण पुढे करत जिग्नेश शाहांना टार्गेट करून त्यांना एक्स्चेंज क्षेत्रातून हद्दपार करण्याचा कट रचणाऱ्यांचा आणि या पाठीमागे असणाऱ्या त्यांच्या हेतूचा छडा लावला आहे. या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीने अगोदरच ॲमेझॉनवर - बिझनेस व इकॉनॉमी - श्रेणीत केवळ ९० दिवसांत विक्रमी विक्री करून प्रथम क्रमांक पटकावला व पाठोपाठ आलेली गुजराती आवृत्ती तर केवळ २५ दिवसांत नंबर वन ठरली. इतकेच नव्हे तर देशातील क्रॉसवर्ड या अग्रगण्य ग्रंथदालनांमध्ये हे पुस्तक नंबर १ बेस्ट सेलर ठरले आहे.